# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक क्र. १२२ / २०२६

**विषय: संशोधन मार्गदर्शकाने विद्यार्थी घेण्यापूर्वी त्यांना ना हरकत प्रमाणपत्र द्यावयाच्या हमीपत्राबाबत.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त संशोधन केंद्रामधील मार्गदर्शक व संशोधक विद्यार्थ्यांना प्रवेश, संशोधक विद्यार्थ्यांना सेवानिवृत्त/राजीनामा, इ. कारणामुळे संशोधन मार्गदर्शक उपलब्ध नसणे, संशोधन कार्यपद्धती, पीएच्.डी ट्रॅकिंगमधील तांत्रिक समस्या, कोर्सवर्क, शुल्क यासारख्या अडचणीं निरसित करण्यासाठी सर्व विद्याशाखांचे मा. अधिष्ठाता यांचे अध्यक्षतेखाली पुणे, अहिल्यानगर व नाशिक येथे अनुक्रमे दिनांक ०९ मे, ११ मे व १२ मे, २०२६ रोजी जिल्हानिहाय शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीरांमध्ये पीएच्.डी. प्रवेशित विद्यार्थ्यांचे काही संशोधन मार्गदर्शक सेवानिवृत्त होतात किंवा राजीनामा देतात परंतु त्यांचेकडील विद्यार्थ्यांना दुसऱ्या संशोधन मार्गदर्शकांकडे जाण्याकरिता सदर संशोधन मार्गदर्शक ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत टाळाटाळ करतात, अशा बाब उपस्थितांनी विद्यापीठाच्या निदर्शनास आणून दिली आहे. यामुळे संशोधक विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो तसेच त्यांना विद्यापीठात येण्याजाण्यामुळे आर्थिक भूर्दंड बसतो.

विद्यार्थी हित लक्षात घेता मा. विभागप्रमुख/मा.प्राचार्य/संचालक, सर्व विद्यापीठ विभाग/सर्व मान्यताप्राप्त संशोधन केंद्रे यांना कळविण्यात येते की, यापुढे कार्यरत पीएच्.डी. प्रवेशित विद्यार्थी व यापुढे नव्याने प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संशोधन मार्गदर्शकांकडून त्यांचे राजीनामा/सेवानिवृत्ती, इ. कारणांमुळे संशोधन मार्गदर्शक बदलण्याची आवश्यकता भासल्यास तातडीने त्यांच्या विद्यार्थ्यांना ना हरकत प्रमाणपत्र देईल अथवा ना हरकत प्रमाणपत्र न दिल्यास संशोधन मार्गदर्शक बदलण्याबाबत हरकत नाही, अशा आशयाचे हमीपत्र भरून घ्यावे.

सदरील हमीपत्र भरून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी संशोधन केंद्रप्रमुखांची असेल, सदर हमीपत्र विद्यापीठाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही, आवश्यकता भासल्यास विद्यापीठाकडून मागणी केल्यास सदरचे हमीपत्र विद्यापीठाकडे पाठविण्यात यावे.

गणेशखिंड, पुणे )
संदर्भ : शै. प्रवेश/2965 )
दिनांक : 07/07/2026 )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रत:**

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था, प्रस्तुत विद्यापीठ.